# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  ०७/१०/२०२३

विनयभंग   :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ७ | १० |
| १ | पा `स्टे खो गेट 219/2023 कलम ३५४, ३५४(अ) , ५०६ भादवि सहकलम १२ पोक्सो | दि ०३.१०.२०२३ चे २३.०० ते २४.०० वा दरम्यान दाकल दि-०६.१०.२०२३ चे २२.३५ वा | अकबर शहा अजगर शहा वय 39 रा रा हनुमान नगर सौकत किराणा जवळ अमरावती | हकीकत् सा प्रकारे ाहे की, यातील पिर्यादी ही इलाजाकरीता दवाखान्यात असता फि ची अल्पवयीन मुलगी ही घरी एकटीच असतांना यातील आारोपी याने नमुद घटना तावेळी व ठिकाणी फिच्या अल्पवयीन मुलीला म्हटले की तुला 500 रुपये देतो असे म्हणुन फिच्या मुलीची छाती दाबली व पोट दाबले फि ची मुलगी रडु लागली तर तिला म्हटले की कोणाला जर सांगीतले तर तुला फासी देवुन मारुन टाकेल् अशी धमकी दिली फि ही घरी परत आल्यावर मुलीने तिला हकीकत सांगीतल्यावर फि ने सास देवर यांना सांगीतले व बदनामी होईल म्हणुन आजापावेता `रिपोर्ट दिला नाही असा फि च्या जबानी रिपोर्टवरुन डीओ आदेशाने गुन्हा दाखल |

घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८८५/२३ कलम ४५७,३८० भादवी | एम आय डीसी जाधव मोटर्स कंपनी अमरावती | दि. २६/०९/२३ चे २१.४५ वा दरम्यान दा. ता. वेळ ०६/१०/२३ चे १७.४४ वा. | मंगेश प्रेमदास तेलमोरे वय ३७ वर्ष रा बडनेरा पाचबंगला | अज्ञात | गुन्हाची थोडक्यात हकीकत अश्या प्रकारे आहे की, यातील नमुद घटना तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे जाधव मोटर्स एमआयडीसी मध्ये असीस्टंट म्हणुन काम करतात यांनी सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता अज्ञात इसम विनाक्रमांकाचे मोपेड वर चार लॅचेटच्या गोण्या नट किं अं ४४,९३७/- रु माल चोरुन घेवुन जात असतांना दिसुन आले. अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८८६/२३ कलम ४५४,३८० भादवी | प्लॉट नं १ भिवापुरकर ले आऊट महेश भवनच्या मागे, अमरावती | दि. ०६/१०/२३ चे ११.१७ वा ते १३.३० वा दरम्यान दा. ता. वेळ ०६/१०/२३ चे १९.१८ वा. | विजय विश्वेशवराव चौधरी वय ६३ वर्ष, रा. प्लॉट नं १ भिवापुरकर ले आऊट महेश भवनच्या मागे, अमरावती | अज्ञात | गुन्हाची थोडक्यात हकीकत अश्या प्रकारे आहे की, यातील नमुद घटना तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे आज रोजी सकाळी ११.१७वा. दरम्यान लाईट बिल भरण्या करीता गेले असता त्यांची बहीण यांच्या येथे जावुन घरी परत १३.३० वा. आले असता फिर्यादीस त्यांच्या घरामागील दरवाजा उघडा दिसला त्यांनी घरात जावुन पाहिले असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले तसेच घरातील तसेच घरातील लोखंडी कपाटाचा दरवाजा उचकलेला दिसला व कपाटामधील लॉकर फोडुन त्यातील जुने वापरते १.४सोन्याचे चैन वजन ८० ग्रॅम किं २४,०००/- रु., २.२सोन्याचे नेकलेस वजन ५० ग्रॅम किं १५,०००/- रु., ३.५सोन्याचे अंगठया वजन ४ग्रॅम किं १२,०००/- रु., ४. ३सोन्याचे कानातील जोड वजन ७.५ग्रॅम किं २,०००/- रु., ५. ७सोन्याचे अंगठया वजन १७ ग्रॅम किं ५१,०००/- रु., ६. २सोन्याचे चैन वजन १७ ग्रॅम किं ५१,०००/- रु., ७.३सोन्याचे कानातील साखळी वजन १५ ग्रॅम किं ४५,०००/- रु., ८.७सोन्याचे अंगठया वजन १७ ग्रॅम किं ५१,०००/- रु., ९.ताट वाटी ग्लास चांदीचे वजन ८० ग्रॅम किं १६,०००/- रु., असा एकुण किं अं २,६७,०००/- रु. असा माल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेला. अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे. बडनेरा अप.न. ७२१/२३ कलम ३७९ भा. दं. वि. | दातेराव गोडाऊन, खंडेलवाल रोड, अमरावती. | घटना ता. वेळ - दि. ०५.१०.२३ चे १४.०० वा. ते दि. ०६.१०.२३ चे ०५.४५ वा. दरम्यान. माहीती वेळ - दि. ०६.१०.२३ चे ०८.३० वा. दाखल वेळ - दि. ०६.१०.२३ चे १०.५४ वा. | राजेश ज्ञानेश्वराव गोफणे, वय ४७ वर्षे, धंदा- म.न.पा.अमरावती सिटी बस सुपरवायझर, अमरावती , रा. आशियाड कॉलनी, शेंगाव नाका, अमरावती. | अज्ञात. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद ठिकाणी अमरावती म.न.पा.च्या मालकीच्या बडनेरा ते अमरावती फे-या करणा-या बसेस उभ्या राहत असुन नमुद वेळी कोणीतरी अज्ञात चोराने म.न.पा.च्या तीन बस गाड्यांमधुन एकुण २१० लिटर डिझेल पाईपच्या साह्याने चोरून नेले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |
| १ | पो.स्टे सिटी कोतवाली अप नं ४४३/२३ कलम ३७९ भादवि | अप राजकमल चौक राजलक्षी टॉकीज अमरावती | अप दि ०५/१०/२०२३ चे २०.०० वा ते २१.०० वा दाखल ता वेळ दि ०६/१०/२३ चे १७.११ वा | अप तरुन बलराम मनानी वय २९ वर्ष रा रामपुरी कँम्प अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे दि ०६/१०२३ रोजी मी समक्ष पो स्टे ला येवुन जबानी रिपोर्ट देतो की वर नमुद पत्यावर राहत असुन लोवर बनविण्याच व्यवसाय करतो दि ०५/१०/२०२३ रोजी मी रात्री २०.०० ते २१.०० वा दरम्यान घरुन जयस्तंभ चौक येथे विदर्भाचा लालबागचा गणपती विसर्जनाचा कार्यक्रम पाहण्याकरिता आलो व तेथुन राजकमल चौक येथे गलो विदर्भाचा लालबागचा गणपती पाहण्याकरिता बरेच लोकांची गर्दी होती मी घरुन जेव्हा लालबागचा गणपती पाहण्याकरिता आलो तेव्हा माझअया गळ्यात सोन्याचा गोफ चापट कड्यांचा १३ ग्रामचा घालुन आलो होतो तो सोन्याचा गोफ किमंत अंदाजे ६४०००/- रु चा राजकमल चौक येथील राजलक्षी टॉंकीजच्या समोर लोकांची गर्दी असल्यामुळे लोटालाटी झाली तेवढ्यात कोनीतरी अज्ञात चोराने गळ्यातील सोन्याचा गोफ १३ ग्रामचा चोरुन नोला अशा अज्ञात ईसमाविरुध्द रिपोर्ट देता आहे अशा फिर्यादिच्या जबानी रिपोर्ट व रुन सदरचा गुन्हा दाखल |

अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| 1. | पां.स्टे. वलगाव अप क्र. 331/23 कलम – 279,337, 338 भा.द.वि. सहकलम 134 मोटार अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल | नांदुरा रेल्वे पुलाजवळ | दि. 03/10/2023 चे 10/00 वा.<br>दि.06/10/2023 चे 21/13 वा. | गौतम रामकृष्ण हाडोळे वय 42वर्षे धंदा शेती रा. नांदुरा बु. ता. जि. अमरावती. | पल्सर गाडी क्र. MH-27-CB-7595 चे चालक | हकिकत अशा प्रकारे आहे की, नक्कल जबाणी रिपोर्ट पो.स्टे वलगाव अम दि . 06/10/2023 गौतम रामकुष्ण हाडोळे वय 42 वर्ष व्यवसाय शेती रा. नादुरा बुजुर्ग ता .जि अमरावती मो. 7888085029 मी समक्ष पो.स्टे वलगाव येथे येवुन जबाणी रिपोर्ट देतो की मी नमुद पत्तावर आई वडील आणी भाऊ व त्याची पत्नी असे ऐकत्र राहतो आणी शेती करतो माझे वडील नामे 3 ऐकर शेती हे नांदुरा ते पुसदा रोड वर आहे. दि 03/10/2023 रोजी सकाळी 07/00 वा.मी शेती चे कामावर गेलो होतो आणी काम करून 12/00 घरी येत असताना नादुंरा स्टड येथे मला गावातील लोकांनी सांगितले की माझे वडील नामे रामकुष्ण श्रावणजी हाडोळे वय 75 वर्ष हे घरून डब्बा घेवुन सकाळी 10/00 वा. पायी शेतात काम करण्या करीता रेल्वे ब्रिज जवळुन जात असताना पाठी मागुन येणारी पल्सर क्र MH-27-CD-7595 काळया रंगाचे चे चालकाने माझे वडीला ला पाठीमागुन धडक दिली तेव्हा त्याचे डावे बाजुला डोळयाचे वरती कपाळाला मार लागुन रक्त निघाले व मुक्का मार लागले तेव्हा पल्सर क्र MH-27-CD-7595 काळया रंगाचे मोटार सायकल स्वार तेथुन पळुन गेले तेव्हा रोडवरती जाणारे रफीक खान सौदागर वय 50 वर्ष आणी सज्जु सौदागर वय 38 वर्ष सर्व रा.नांदुरा यानी मला सागितले तेव्हा मी व माझा लहान भाऊ शरद रामकुष्ण हाडोळे वय 38 वर्ष रा नादुरा बुजुर्ग ता.जि अमरावती यानी गावातील अटो मध्ये बसवुन उपचारा करीता किटुकले हास्पीटल कठोरा नाका तेथे नेले माझे वडील ची प्रकुत्ती सिरीयस असल्याने त्यानी अडमिट न करता मला जिल्हा सामाण्य रूगणाल्य अमरावती येथे नेणायास सागितले तेव्हा मी माझे वडीलाना सरकारी हास्पीटल येथे भर्ती केली तेथे प्राथमिक उपचार केली तेथील वैधकिय अधिकारी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | यांनी सागितले की तुम्चे वडीलाची प्रकुती जास्त खराब आहे तुम्ही त्यांना पुढील उपचार करीता त् नागपुर येथे नेण्यास सांगितले तेव्हा आम्ही त्याना नागपुर येथे न नेता खाजगी सावदेकर हास्पीटल रूखमिणी नगर अमरावती येथे भर्ती केली माझे वडील हे सीरीयस असुन ते बोलत नाही त्याचे ईलाज शुरु आहे. दि 03/10/2023 रोजी सकाळी 10/00 वा.माझे वडील हे माझे शेतात काम कऱण्या करीता पायी जात असताना नादुंरा रेल्वे पुला जवळ पाठी मागुन येणारी पल्सर गाडी क्र MH-27-CD-7595 चे चालक हा त्याचे ताब्यातील दुचाकी ही भरदाव वेगाने व निष्काळजी पणाने चालवुन माझे वडीला पाठी मागुन जोरदार धडक देवुन गंभीर जख्मी केली आणी तेथुन पळुन गेली गावातील लोकांनी त्याचे गाडी चे नंबर पाहुन मला व माझे लहान भाऊ शरद याना माहीती दिली त्याचे वर योग्य ती कार्यवाही व्हावी करीता मी आज दिनाक 06/10/2023 रोजी पोलीस स्टेशन वलगाव येथे जबाणी रिपोर्ट देत आहे.हेच माझे जबाणी रिपोर्ट आहे माझे सागणे प्रमाणे सागणकावर टंकलिखीत केली प्रिन्ट काढुन वाचुन पहिले बरोबर आहे अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन गुन्हा सदरचा दाखल |

ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अप . क्र ८१६/२०२३ कलम २९४ ५०६ ब ३४ भादवि | .लायब्ररी चौक फ्रेजरपुरा अमरावती | दि ०६/१०/२०२३ चे ११/०० वा. दा ता वेळ दि ०६/१०/२०२३ चे १९/३६ वा. | संकेत प्रफुल वाघमारे वय २४ वर्ष व्यवसाय मजुरी रा.लायब्ररी चौक फ्रेजरपुरा अमरावती | १)खुशाल अनिल तायडे वय २३ वर्ष व २) मोहित उर्फ भय्यु सुभास सुयवंशी वय २२ वर्ष हे दोघे.लायब्ररी चौक फ्रेजरपुरा अमरावती | नक्कल जबानी रिपोर्ट पो.स्टे फ्रेजरपुरा दि. ६/१०/२०२३ संकेत प्रफुल वाघमारे वय २४ वर्ष व्यवसाय मजुरी रा.लायब्ररी चौक फ्रेजरपुरा अमरावती मि समक्ष पोलीस स्टेशनला येवुन जबानी रिपोर्ट देतो कि वरील दिलेल्यापत्यावर आईव आजीसह राहत असुन कलपेटींगचे मजुरीचे काम करतो आमचे मोहल्यात राहणारा खुशाल अनिल तायडे वय २३ वर्ष व मोहित उर्फ भय्यु सुभास सुयवंशी वय २२ वर्ष हे दोघे ही जुण्या भाडणाचे कारणावरुन माझे सोबत नेहमी वाद करुन शिविगाळ करुन मारण्याची धमकी देतो आज दि ६/१०/२०२३ चे ११/०० वा दरम्यान मि माझे घरासमोर उभा असताना खुशाल अनिल तायडे व मोहित उर्फ भय्यु सुभाष सुर्यवशी असे दोघे आले व खुशाल तायडे याने मला म्हटले कि तु माझा रिपोर्ट का दिला होता असे म्हणुन माझे सोबत वाद करुन शिविगाळ केली जिवाने मारण्याची धमकी दिली त्यावेळी बाजुला उभे असलेले शुभम प्रविण वाघमारे व निलेश रामचंद्र कोडे हे आले व त्यानी आमचे भांडन सोडले व ते दोघे तेथुन निघुन गेले त्या दोघांचा मला नेहमिचा त्रास असल्याने मि त्या दोघांवर कार्यवाही करीत पो.स्टे ला रिपोर्ट देते आहे हाच माझा रिपोर्ट आहे माझे सागणे प्रमाणे लिहीला मि वाचुन पाहीला सांगणे प्रमाणे बरोबर लिहीला आहे .अशा पिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| 2 | पोस्टे. नांदगाव पेठ अप.न. ३९४/२३ कलम २८३ भादवी | गायगोले मटन दुकान नांदगाव पेठ | दि. ०६/०१०/२३ चे १८.०० वा. दि. ०६/१०/२३ चे १९.२५ वा | सरतर्फे स.पो.उपनि. राजु काळे ब.न. ८५७ पोस्टे. नांदगाव पेठ | अजय महादेव गायगोले वय ३८ वर्ष रा. शासकीय वसाहत नांदगाव पेठ | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घ.ता.. वेळी व ठिकाणी फि. पो.स्टॉफ सह पोस्टे. एरियात पेट्रोलिंग करीता असतांना एका इसमाने गायगोले मटन दुकान आम रोडवर लावुन मटन विक्री करीता असतांना मिळुन आला. सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही उपाय योजना केल्याचे दिसुन आले नाही त्यामुळे येणा-या जाणा-या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण हेईल अशाप्रकारे दुकान लावुन मिळुन आला. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पोस्टे. नांदगाव पेठ अप.न. ३९५/२३ कलम २८३ भादवी | डोईफोडे ` मटन दुकान नांदगाव पेठ | दि. ०६/०१०/२३ चे १८.२० वा. दि. ०६/१०/२३ चे १९. ३५ वा | सरतर्फे स.पो.उपनि. राजु काळे ब.न. ८५७ पोस्टे. नांदगाव पेठ | नितीन गजानन डेईफोडे वय ३२ वर्ष रा. गजानन नगर नांदगाव पेठ | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घ.ता.. वेळी व ठिकाणी फि. पो.स्टॉफ सह पोस्टे. एरियात पेट्रोलिंग करीता असतांना एका इसमाने डोईफोडे` मटन दुकान आम रोडवर लावुन मटन विक्री करीता असतांना मिळुन आला. सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही उपाय योजना केल्याचे दिसुन आले नाही त्यामुळे येणा-या जाणा-या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण हेईल अशाप्रकारे दुकान लावुन मिळुन आला. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पोस्टे. नांदगाव पेठ अप.न. ३९६/२३ कलम २८३ भादवी | जानमाता चिकन विक्री चे दुकान नांदगाव पेठ | दि. ०६/०१०/२३ चे १८. ५० वा. दि. ०६/१०/२३ चे १९. ४९ वा | सरतर्फे स.पो.उपनि. राजु काळे ब.न. ८५७ पोस्टे. नांदगाव पेठ | अभिजीत बाबाराव पारवे वय १९ वर्ष रा. परदेशीपुरा नांदगाव पेठ | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घ.ता.. वेळी व ठिकाणी फि. पो.स्टॉफ सह पोस्टे. एरियात पेट्रोलिंग करीता असतांना एका इसमाने जानमाता चिकन विक्री चे दुकान आम रोडवर` दुकाण लावुन चिकन विक्री करीत असतांना मिळुन आला. सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही उपाय योजना केल्याचे दिसुन आले नाही त्यामुळे येणा-या जाणा-या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण हेईल अशाप्रकारे दुकान लावुन मिळुन आला. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| 4 | वलगाव अप क्र.329/23 कलम -294,323,506 ,34 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल | ग्राम खारतळेगाव | दि. 06/10/2023 चे 15/00 वा<br><br>दाखल दि.06/10/2023 चे 20/16 वा. | अमोल भरतराव मारोळकर वय 45धंदा शेती रा. खारतळेगाव ता. भातकुली जि. अमरावती | 1) एक महिला<br>2) प्रशांत विनोद मारोळकर वय 45वर्षे<br>3) एक महिला<br>4) निलेश विनोद मारोळकर वय 30वर्षे सर्व रा. खारतळेगाव ता.भातकुली जि. अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, नक्कल जबाणी रिपोर्ट मी समक्ष पो.स्टे. ला येउन जबाणी रिपोर्ट देतो की, मी वर नमुद पत्यावर राहतो व शेती व्यवसाय करतो माझे घराचे कंम्पाऊंड वॉलचे बांधकाम शिल्लक राहले आहे. त्याकरीता कॉलमचे गड्डे करण्याचे ठरविले आहे आज दि. 06/10/2023 रोजी दुपारी अं. 03/00वा. दरम्यान कंम्पाऊंड कॉलमचे गड्डे करणारे मजुर संतोष शेंडे हे आले त्यांनी गड्डा करण्यास सुरुवात केली. तेव्हा माझी महिला नातेवाईक व तिचा मुलगा व मुलगी व निलेश विनोद मारोळकर वय30 वर्षे हे आले. म्हणाले येथ गड्डा करु नको, या कारणावनरुन मी त्यांना म्हटले की, मी माझे जागेत कॉलमचा गड्डा करीत आहे, ती म्हणाली की, तु असा कसा गड्डा खोदतो तुला पाहते, असे म्हणुन एकदम चौघेही माझे अंगावर चढुन आले, प्रशांत मारोळकर याने मला पकडुन बाकीचे तिघांनी थापडा बुक्यांनी मारहाण केली त्यामुळे माझे डावे डोळयांच्या व डाव्या कानाला खरचटले सारखा मार लागला आहे. मला शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. त्याचे पासुन माझे व माझे कुटुंबीयांच्या जिवीतास धोखा निर्माण झाला आहे. तरी माझ्या रिपोर्ट ची चौकशी व्हावी करीता रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन गुन्हा सदरचा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | .पोस्टे वलगाव अप क्र.330/2023 कलम .323,294,506,34 भादवि. | ग्राम खारतळेगाव | दि.06/10/2023 चे 15 वा.<br><br>दाखल दि.06/10/2023 चे 20/47 वा. | एक महिला | 1) अमोल भरतराव मारोळकर वय 45<br>2) एक महिला<br>3) एक महिला रा. खारतळेगाव ता.भातकुली जि. अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, मी समक्ष पो.स्टे. ला येउन जबाणी रिपोर्ट देते की, मी वर नमुद पत्यावर राहते व घरकाम करते माझे घराशेजारी अमोल भरतराव मारोळकर वय 45 यांचे घर आहे. माझे सोबत जागेच्या कारणावनरुन वारंवार वाद करतात आज दि. 06/10/2023 रोजी दुपारी 03/00वा. दरम्यान मी माझे घरी हजर असतांना माझे शेजारी राहणारा अमोल भरतराव मारोळकर वय 45 याचा मानुस मजुर हा कंम्पाऊंड वॉलचा गड्डा खोदण्याकरीता आला व गड्डा खोदण्यास सुरुवात केली तेव्हा मी म्हटले गड्डा तुमच्या जागेतच खोदा, असे म्हटले असता अमोल भरतराव मारोळकर वय 45 हा तेथे आला आणी एकदम मला अश्लील भाषेत म्हणुन एकदम कुदळी घेउन माझे अंगावर चालुन आला तेव्हा माझी मुलगी ही भांडण सोडविण्याकरीता आली त्याने आणि त्याचे पत्नी व एक महिला यांनी मारहाण केली. तसेच माझा मुलगा याला सुद्धा मारहाण केली. अमोल भरतराव मारोळकर याने माझे मुलास सुद्धा मारहाण करुन मारण्याची धमकी दिली. त्याचेवर योग्या कारवाई व्हावी याकरीता रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन गुन्हा सदरचा दाखल |

जुगार :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | पो स्टे फ्रजरपुरा | अप क्रं 815/2023 कलम 109 भादवी सहकलम 12 (अ) महा जुगार कायदा | वडाळी बसस्टॉंप मशीद जवळ संतोष सुरजुसे चे घराजवळ अमरावती | दि 06.10.2023 चे 14.10 वा | दि 06.10.2023 चे 18.43 वा | पोहेकॉं सुनिल सोळंके ब न 289 पो स्टे फ्रेजरपुरा | विणु जानकीलाल बेनीवाल वय 28 रा परीहारपुरा वडाळी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे डि बी पथक पो स्टाएफ पो स्टे हद्दीत पेटोलिंग करीत असता मिळालेल्या गोपनीय माहीतीवरुन नमुद घ ता वेळी व टीकाणी जुगार रेड केली असता असता यातील आरोपी क्र 1 हा लोकांकडुन पैसे घेवुन वरली मटका चा चिठअया देतांना दिसुन आल्याने त्याचेवर जुगार रेड करुन त्याचे ताब्यातुन नगदी 460- रु व स्ट्टा प्टाटचे चिठ्या मिळुन आले तसेच त्यास विचारपुस केली असता त्याने सांगीतले की सदर ठीकाणी मी आरोपी संतोष श्यामराव सुरजुसे रा वडाळी बस्टॉं मज्जीत यांचे सांगणे वकुन त्याचे कडे रोजदारी 300 रु प्रमाणे काम करतो व सट्टा पट्टा टिठी.ा पैशे हे त्यास देत असता असे पंच व आमते समक्ष सांगीतले आरोपी क्रं 2 संतोश सुरुजुसे हा सदरचा अवैध्य जुगार धँदा साथीदारचे मदतीने चालवित असल्याचे निष्पन्न झाल्याने फिर्यादी च्या लेखी रिपोर्ट वरुन आरोपी क्रं 1 व 2 यांचे विरुध्द कलम 109 भआदवी सहकलम 12 (अ) महा जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | वलगाव | अप क्र.328/23 कलम 12 अ.म.जु. का.प्रमाणे दाखल. | पाण्याची टाकी जवळ गोपाळपुर | दि. 06/10/2023 चे 12 वा. | दि.06/10/2023 चे 19/01 वा. | सरतर्फे - फिर्यादी - पो.हे. का.ईशय खांडे बं.नं. 1205पो.स्टे .वलगाँव.अमरावती शहर. | प्रजज्वल रविंद्र वाकोडे वय 20वर्ष रा.गोपाळपुर ता. जि. अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील वरिल विषयास अनुसारुन आज दि.06/10/2023रोजी माझी व सोबत पोहेकाँ साबीर ब.नं 1067याचेसह 09/00वा.ते21/00वा.पर्यंत बीट मार्शल डयुटी असतांना गुप्तबातमी दार कडुन माहिती मिळाली की गोपाळपुर येथे एक इसम हा लोकानकडुन पैसे घेवुन वरली मटकयाचा जुगार चालवित आहे.अशा माहितीवरुन पंचनाम्यातील नमुद पंच असे खबरी प्रमाणे गेलो असता दुपारी 12/00वा.गोपाळपुरच्या पाण्याचे टाकी खाली एक ईसम जुगाराचा 01ते10 आकडयावरील मटका नावाचा जुगार पैसे घेवुन हार जितीचा खेळ खेळत होता व त्याचे भवतीक काही कोल उभे होते तरी वरील मटका चालु असल्या बाबत पंचांना दाखवुन खात्री केली व पोहेकाँ साबीर ब.नं.1067 च्या मदतीने त्यांना घेराव घातला असता वरली मटका आकडे लिहणारा ईसम यास पैसे व आकडे लिहलेल्या चिठीसह पोलीस आमलदारांच्या मदतीने जागीच पकडले तर त्याचे भोवतालचे लोक हे पळुन गेले तेव्हा सदर पकडलेल्या इसमाची अंगझडती घेवुन त्याला त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव प्रजज्वल रविंद्र वाकोडे वय 20वर्ष रा.गोपाळपुर ता. जि. अमरावती असे सांगीतले तरी सदर आरोपी कडुन 1)700/-रु नगदी व वरली मटक्याचे आकडे लिहलेली एक चिठ्ठी कि.अं.00.00रुपये असा एकुन 700/-रु चा मुद्देमाल पंचा समकृष रेड करुन जप्त केला.सदर आरोपीतांचे कृत्या हे कलम 12 अ मजुका प्रमाणे होत असल्याने माझी वरील आरोपीतांविरुध्द कायदेशीर लेखी तक्रार आहे.अशा फिर्यादीचे लेखी तक्रार वरुन सदर चा गुन्हा दाखल |
| ३ | पो.स्टै. कोतवाली | अप क्र ४४२/२३ कलम १२ अ मजुका | राका मालच्या बाजुला गल्लीत मुत्री घराजवळ अमरावती | दि ०६/१०/२०२३ चे १५.३० वा | दि ०६/१०/२०२३ चे १६.४० वा | सपोउपनि राजेश सपकाळ बं न. ६२४पो स्टे सिटी कोतवाली अम शहर | १) अभिजीत ओंकारराव माहुलकर वय ३५ वर्ष रा बेलपुरा अमरावती २) उत्तम यादवराव कांगळे वय ६३ वर्ष रा शिवनगर विलास | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी हे पो, स्टे्कोतवाली येथे तैनातीस असुन डी बी पथकामध्ये काम करतात दि ०५/१०/२३ रोजी नापोका २९६, पोका ३७२, पोका १७७६, पोका १७०४ असे पो. स्टे असे आज दि ०६/१०/२०२३ चे ०९.०० वा ते २१.०० वा पावेतो ड्युटी करित असतांना गुप्त बातमीदाराकडुन खत्रीलीयक माहीती मिळाल्याने एक ईसम राका मालच्या बाजुला गल्लीत मुत्री घराजवळ १ ते १० आकड्यावर चिठ्याचा वरली मटका नावाचा खेळ लोकाकडुन पैसे घेवुन खेळतांना दिसुन आले आम्ही लपत छपत गलो असता असा जुगार खेळणारे ईसम आमची चाहुल लागताच आम्हाला पाहुन पळुन गेले व जुगार खेळणा-या ईसमास पंचासमक्ष पोलीस स्टापच्या मदतीने जागीच पकळुन त्यास आमचा व पंचाचा परिचय देवुन त्याना त्याचे नाव गाव विचारले |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | नगर अमरावती | असता त्यांनी त्याचे नाव १) अभिजीत ओंकारराव माहुलकर वय ३५ वर्ष रा बेलपुरा अमरावती २) उत्तम यादवराव कांगळे वय ६३ वर्ष रा शिवनगर विलास नगर अमरावती असे सांगितले सदर पंचासमक्ष अंगझडती घेतली असता वरली मटक्याचे आकडे लिहलेल्या सहा चिठ्या नगदी ९२०/- रु व एक डॉट पेन कि अ १० रु व जुगार माल जुगार माल मिळुन आला मुद्देमाल जागीच पंचासमक्ष जप्त करण्यात आला सदर ईसम नामे १) अभिजीत ओंकारराव माहुलकर वय ३५ वर्ष रा बेलपुरा अमरावती २) उत्तम यादवराव कांगळे वय ६३ वर्ष रा शिवनगर विलास नगर अमरावती यास पो स्टे ला आनुन कलम १२ अ मजुका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल |

प्रोव्हिशन :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावती शहर | ८१४/२०२३ कलम ६५(क)(ड) (फ) मदा का. | सिकलकरीपुरा वडाळी अमरावती | दि ०६/१०/२०२३ चे १२/५५ वा. | दि ०६/१०/२०२३ चे | पोहेकॉं सुनिल सोळंके ब न 289 पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | बिजलकौर अजाबसिंग टाक वय 50 रा सिकलकपुरी वडाळी अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी नमुद घ ता वेळी व ठिकाणी . फिर्यादी हे पो.स्टाफ सह पेट्रोलीग करीता असता मिळालेल्या गोपनिय माहीतीवर जावुन पाहता यातील आरोपी ही गावरानी दारु ची रनींग भटटी काढताना मिळुन आली तीच्यावर पोव्ही रेड केली घटनास्थळ जप्ती पंचनामा प्रमाणे रनीग गा.हा.भ.ची दारुची भटटी या प्रमाणे एक मोठा लोखंडी ड्रम ज्यामध्ये १०० लीटर गा.हा.भ. दारु कि.अदाजे १०,०००/- रु व २० लीटर मोहमाच सडवा कि. अंदाजे ४०००/- जर्मन ची ताटली रबरी नळी इधन घमेले कि.अदाजे २०००/- असा एकुन १६०००/- रु प्रोव्ही मुददेमाल सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोलीस स्टेशन वलगाव | अप क्र.332/2023 कलम 65 म.दा.का. प्रमाणे दाखल. | ग्राम नांदुरा | दि.06/10/2023 चे 19/30 वा. | दि.06/2023 चे 22/32 वा. | सरतर्फे - फिर्यादी :- पो हे.कॉ इशय खांडे ब.नं.1205 पो.स्टे. वलगाव ,अमरावती | आरोपी (फरार) नामे मोहन शामराव राठोड वय 53वर्ष रा. ग्राम नांदुरा बु. ता.जि.अमरावती | हकिकत आशा प्रकारे आहे कि नमुद घटना ता वेळई व ,आम्ही पो हे.कॉ इशय खांडे ब.नं.1205 पो.स्टे.वलगाव,अमरावती शहर लेखी फिर्याद देतो कि, आज दि.06/10/2023चे सकाळी 09/00ते रात्री 21/00 पो.स्टे.ला बिट मार्शल डयुटी असतांना अंदाजे 19/00दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली कि,ग्राम नांदुरा बु. वार्ड नं. 02 येथे एक इसम आपले घरासमोर अवैधरित्या बिना परवाना देशी दारुची विक्री करीत आहे. अशा माहीतीवरुन आम्ही सोबत पंच व पोलीस स्टाफा स.पो.उप.नि दादु दहीकर ब.नं. 919 HC साबीर ब.नं.1067 पो.कॉ सतिश |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शहर | | ब.नं.1818 असे मिळालेल्या माहीती प्रमाणे पो.स्टे मधुन खाजगी दुचाकी वाहनाने रवाना होवुन ग्राम नांदुरा बु. बसस्टॉप येथे जाउन खाजगी दुचाकी वाहन बसस्टाफ जवळ उभे करुन नमुद पंचासह पायदळ लपतछपत जावुन वार्ड नं.02 येथे जावुन पोलीस स्टाफा व पंचासह पाहणी केली असता एक इसम आपले राहते घरासमोर हातात प्लास्टीक पिशवी घेवुन अवैधरित्या बिनापरवाना देशी दारुची विक्री करीत असतांना दिसुन आला .पोलीस स्टाफ व पंचासहर नमुद इसमावर पो.स्टॉफ व पंचसह सांयकाळी 19/30 वा प्रो.व्ही रेड केली असता पोलीसांची चाहुल लागताच दारु पिणारे लोक व दारु विक्री करणारा इसम पोलीसांना पाहुन हातातील प्लास्टीक पिशवी जागीच सोडुन पळुन गेले पाठलाग केला असता मिळुन आले नाही आजुबाजुचे लोकांनी दारु विक्री करणा-या इसमाचे नाव गाव विचारले असता त्याचे नाव मोहन शामराव राठोड वय 53वर्ष रा. ग्राम नांदुरा बु. ता.जि.अमरावती असे सांगीतले नमुद इसमाने जागीच सोडुन गेलेले प्लाँस्टीक पिशवीची पंचासमक्ष पाहणी केली असता पिशवी मध्ये देशी दारु संत्रा बॉबी 90\-MLचे 15 नग प्रत्येकी किंअं..35/- रुपये असा एकुण 525/- रुचा माल मिळुन आल्याने सदरचा माल जप्ती पंचनाम्याप्रमाणे पंचासमक्ष जप्त केला नमुद आरोपीचे कृत्य कलम 65 (ई)म.दा.का प्रमाणे होत असल्याने सरकार तर्फे कायदेशीर आरोपी विरुध्द लेखी फिर्याद आहे. |

अकस्मात मृत्यु:-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | घटना ता वेळ दाखल ता वेळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| 4 | पो.स्टे. राजापेठ मर्ग क्र. १०४/२०२३ कलम १७४ जाफौ | हमालपुरा, अमरावती | दि ०६.१०.२०२०२३ चे १४.०० वा. दि. ०६.१०.२०२३ चे २०.५१ | त्र्यंबक नामदेव सोनसाळे वय ६५ वर्ष, रा हमालपुरा, अमरावती | संतोष त्र्यंबक सोनसाळे, वय ४७ वर्ष, रा हमालपुरा अमरावती | यातील फिर्यादी यांनी पो स्टे ला जबाणी रिपोर्ट दिला की, आज दिनांक ०६.१०.२०२३ रोजी नेहमीप्रमाणे शेरे पंजाब धाब्यावर सकाळी ०८.०० वा दरम्यान मजुरीला गेलो होतो माझी पत्नी सुध्दा मजुरीला गेली होती व मुलगा शिक्षणाकरीता बाहेर गेला होता दुपारी ०२.०० वा दरम्यान मुलगा ओम हा त्याचे कॉलेजवरुन घरी परत आला असता घरातील किचन मध्ये माझे वडील त्र्यंबक नामदेव सोनसाळे वय ६५ वर्ष, रा हमालपुरा, अमरावती यांनी सिलींग फॅनला नायलॉन दोरीच्या सहायाने गळफास घेतल्याचे दिसले त्याने मला लगेच कळविले मी लगेच घरी पोहचलो तर मला माझे घरातील किचन मध्ये नॉयलॉन दोरीच्या सहायाने गळफास घेतल्याचे दिसले मी लगेच पोलसांना फोनव्दारे माहिती दिली पोलीसांनी पुढील कारवाई करीता प्रेत इर्विन दवाखाना येथे नेले. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल |